# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : के.आर-२६१/२०२१ (तक्रार)

**तक्रारकर्ता,** श्री.संतोष विकास सावरकर
श्री सिध्दिसागर एस.आर.ए.सहकारी गृह.संस्था
दुसरा मजला, रूम नं.२१०, वरळीगांव बसडेपो जवळ
वरळी, मुंबई ४०० ०३०

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.३.२०२० | ----- | १७.११.२०२० | २४.१२.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि.२.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी माहिती देण्यास कसुर करीत असलेबाबत." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" (ग्रुप ग्रामपंचायत काशिद दप्तरी नोंद असलेल्या गाव/मौजे सर्वे, प्रचलित गट नंबर १८६ मध्ये असलेल्या घराबद्दल माहिती मिळण्याकरीता अर्ज.) "

(१) उपरोक्त विषयांकित घर बांधकाम ना-हरकत दाखला मिळण्याकरीता केलेल्या अर्जाची त्यासोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांच्या व त्याच्या आवक नोंद रजिस्टर नोंद वहीची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(२) उपरोक्त विषयांकित अर्जाच्या अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायत काशिद यांनी घेतलेल्या मासिकसभेच्या ठरावाची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(३) उपरोक्त विषयांकित देण्यात आलेल्यां ना-हरकत दाखल्याची व त्याच्या जावक रजिस्टर नोंद वहीतील जावक नोंदणीक्रमांकाची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(४) उपरोक्त विषयांकित घर बांधकाम पूर्ण केल्यानंतर एसेसमेंट आकारणी करीता केलेल्या अर्जाची व त्या सोबत जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडील बांधकाम परवानगीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून मिळावी.

(५) उपरोक्त विषयांकित घराच्या एसेसमेंट आकारणीसाठी घेण्यात आलेल्या ठरावाची व त्यानुसार आकारण्यात आलेल्या एसेसमेंट नमुना ८ नोंद वहीच्या छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती देण्यास कसूर." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.१२.२०२० रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"१. अपिल मान्य करण्यात येत आहे. २. अर्जदार श्री. नागवेकर यांनी त्यांचेकडील अर्ज दि.२.३.२०२० अन्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक , ग्रामपंचायत काशिद यांनी ग्रा. पं. दप्तरी शोध घेऊन १५ दिवसांच्या आत विनामूल्य देणेत यावी. (५०० प्रती विनामुल्य व त्या पुढील प्रती नियमानुसार फी आकारून देणेची आहे)."

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेविरुध्द कारवाईची मागणी केली आहे.

प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रथम अपिलिय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसांत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तरीसुध्दा अदयापपर्यंत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सबब, तक्रारकर्ता यांना झालेल्या विलंबासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतका दंड का करण्यात येऊ नये तसेच त्यांचेविरुध्द विभागीय कारवाई का करण्यात येऊ नये याची विचारणा करणारी "**कारणे दाखवा**" नोटीस पाठविणे उचित होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली उपलब्ध माहिती त्यांना १५ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २.३.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाकडे व्यक्तीश: सादर करावा. अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरुड, जि.रायगड ४०२ ४०१
**– यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१ **यांचेमार्फत रवाना.**